cmyk

## संपादकीय

### एका राजीनाम्यासाठी एक महिना कशाला?

लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा असतो, पण तो ऐकवण्यासाठी विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागणे ही कोणत्याही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रिया आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारने वेळेवर आणि पारदर्शक भूमिका घेणे अपेक्षित असते. कारण या विषयांचा संबंध केवळ राजकारणाशी नसून देशाच्या भावी पिढीशी असतो.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक


बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-१२६ | रविवार दि.२६ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# राज्यात चांगला पाऊस पडून शेतकरी सुखी होऊ दे

## मुख्यमंत्र्यांचे विठुरायाला साकडे, धाराशिवमधील शेतकरी दाम्पत्याला महापूजेचा मान

पंढरपूर । प्रतिनिधी

**देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी (दि. २५ जुलै) श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या हस्ते पार पडली. महाराष्ट्रावर विठूमाऊलीची कृपादृष्टी सदैव राहो, राज्यात सुख-समृद्धी नांदो, शेतकरी सुखी-समृद्ध होवोत आणि जनतेच्या जीवनात आनंद व समाधान लाभो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री फडणवीस विठूमाऊलीच्या चरणी केली.**



मी अत्यंत भाग्यवान आहे. मला सहावेळा आषाढी आणि दोनवेळा कार्तिक वारीत पूजा करण्याची संधी मिळाली. हा विठूरायाचा आशीर्वाद आहे. राज्यामध्ये चांगला पाऊस व्हावा आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळावा. शेती चांगली पिकावी. शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आनंद यावा, अशी विठुरायाच्या ▶▶ पान २ वर

# अखेर सरकार झुकले ; धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे आणि दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या तरुणांच्या मोठ्या आंदोलनाचा गैरफायदा घेण्यापासून ''राष्ट्रविरोधी शक्तींना'' रोखणे, या उद्देशाने हा निर्णय घेतल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले. मोदी सरकारमधील



एखाद्या वरिष्ठ मंत्र्याने सततची रस्त्यावरील आंदोलने आणि राजकीय दबावामुळे पद सोडल्याची ही एक दुर्मिळ घटना असून, सरकारला अखेर विद्यार्थ्यांच्या या आंदोलनापुढे झुकावे लागले आहे.

आंदोलकांची मुख्य मागणी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हीच होती. 'कॉकरोच जनता पार्टी' आणि केंद्र सरकार यांच्यातील चर्चेची तिसरी फेरी सुरू होण्यापूर्वी काही तास आधी धर्मेंद्र प्रधान यांनी 'एक्स' वर आपल्या निर्णयाची घोषणा केली. चर्चेच्या या तिसऱ्या फेरीपूर्वी, कॉकरोच जनता पार्टीच्या नेत्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा ही ''अटळ'' मागणी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### देवेंद्र फडणवीस नवे शिक्षणमंत्री होणार-राऊत

मुंबईः केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही चर्चांना उधाण आले आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केंद्रात शिक्षणमंत्रीपदाची संधी मिळू शकते, असा मोठा दावा केला आहे. फडणवीस तातडीने दिल्लीला रवाना झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी, ''ते शिक्षित आहेत, कायद्याचे जाणकार आहेत आणि विविध विषयांवर प्रभावीपणे भूमिका मांडतात. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांच्या जागी त्यांची निवड होण्याची शक्यता आहे,'' असे म्हटले. याचवेळी राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाल्याचे सांगत, गेल्या बारा वर्षांत प्रथमच जनआंदोलनाच्या दबावामुळे केंद्रीय मंत्र्याला राजीनामा द्यावा लागल्याचा दावाही त्यांनी केला.

### राजिनामा झाला तरी आजचा मोर्चा निघणारच

मुंबईः केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतरही रविवार दि.२६ रोजीचा मुंबईतील मोर्चा रद्द होणार नसल्याचे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी, ''राजीनामा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, पण आंदोलन संपलेले नाही. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज, दाखल झालेले गुन्हे आणि पोलिसांच्या कारवाईबाबत उत्तर मिळाले पाहिजे,'' असे म्हटले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे कौतुक करत हा युवाशक्तीच्या एकजुटीचा विजय असल्याचे सांगितले. मोर्चा कार्यक्रम पूर्वनियोजितप्रमाणे शिवाजी पार्क परिसरातच होणार असून, पुढील आंदोलनाची दिशा विद्यार्थी नेत्यांशी चर्चा करून ठरवली जाईल, अशी माहितीही उद्धव ठाकरेंनी दिली.

### जगातील सर्वात मोठ्या तेल कंपनीवर मिसाइल हल्ला

दिल्लीः अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सौदी अरेबियातील अरामकोशी संबंधित तेल सुविधांवर मिसाइल आणि ड्रोन हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. जिजान, यानबू आणि दमाद परिसरात स्फोटांचे आवाज ऐकू आले असून, काही भागातील वीजपुरवठाही खंडित झाला आहे. या हल्ल्यामागे येमेनमधील हूती बंडखोरांचा हात असल्याचा दावा केला जात आहे. हल्ल्यानंतर यानबू प्रांतात आपत्कालीन अलर्ट जारी करण्यात आला आहे. अरामको ही जगातील सर्वात मोठी तेल कंपनी असल्याने या घटनेमुळे जागतिक तेलपुरवठा आणि इंधनाच्या किमतींबाबत चिंता वाढली आहे.




## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६.०० क्विंटल | २,६०० | २,६८९ | २,६५७ |
| ज्वारी/हायब्रिड :९५.५० क्विंटल | २,४६० | ४,७०० | ३,२९० |
| मका/लोकल: २०.०० क्विंटल | २,३२३ | २,३२३ | २,३२३ |
| तूर : २.०० क्विंटल | ७,६०१ | ७,६०१ | ७,६०१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:११.५० क्विंटल | १,९८१ | २,६६३ | २,४२२ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ५,५०१ | ५,७७१ | ५,६३६ |




cmyk

## अग्रलेख

# एका राजीनाम्यासाठी एक महिना कशाला?

लोकशाहीत जनतेचा आवाज महत्त्वाचा असतो, पण तो ऐकवण्यासाठी विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागणे ही कोणत्याही लोकशाहीसाठी चिंतेची बाब आहे. शिक्षण व्यवस्था, परीक्षा प्रक्रिया आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारने वेळेवर आणि पारदर्शक भूमिका घेणे अपेक्षित असते. कारण या विषयांचा संबंध केवळ राजकारणाशी नसून देशाच्या भावी पिढीशी असतो.

अलीकडील विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पद सोडल्याची घटना अनेक प्रश्न उपस्थित करते. जर अखेरीस असा निर्णय घ्यावाच लागणार होता, तर तो इतक्या विलंबाने का झाला? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही, तर लाखो विद्यार्थी, पालक आणि समाजाचाही आहे. या काळात विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका गळती, परीक्षांतील कथित अनियमितता, प्रवेश प्रक्रियेतील अडचणी आणि भरती प्रक्रियेतील विलंब याविरोधात आवाज उठवला. अनेक शहरांत आंदोलन झाले. काही ठिकाणी पोलिसांशी संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली. विद्यार्थ्यांचा अभ्यास, स्पर्धा परीक्षांची तयारी आणि मानसिक स्वास्थ्य यावर त्याचा परिणाम झाला. दरम्यान, काँग्रेससह विविध विरोधी पक्षांनी हा मुद्दा संसदेत आणि रस्त्यावर सातत्याने उपस्थित केला. त्यामुळे सरकारवर राजकीय दबाव वाढला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू राहिले; मात्र या संघर्षात सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांनाच बसला. राजकीय श्रेय कोणाला मिळाले, हा वेगळा मुद्दा असला तरी आंदोलनाचा केंद्रबिंदू विद्यार्थ्यांचे प्रश्न हेच होते. लोकशाहीमध्ये आंदोलन हा घटनात्मक अधिकार आहे. इतिहास साक्षी आहे की अनेक महत्त्वाचे निर्णय जनतेच्या सातत्यपूर्ण दबावानंतरच झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपला आवाज उठवला, याला लोकशाहीच्या चौकटीत महत्त्व आहे. मात्र, आदर्श परिस्थितीत विद्यार्थ्यांना अभ्यास सोडून आंदोलन करावे लागू नये, ही जबाबदारी शासन आणि प्रशासनाची असते. याच प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न समोर आणला आहे. एका व्यक्तीच्या राजीनाम्याने व्यवस्था बदलते का? उत्तर स्पष्टपणे ''नाही'' असेच आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित होणार का, पेपरफुटी रोखण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी राहणार का, भरती प्रक्रिया पारदर्शक होणार का आणि विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण होणार काया प्रश्नांची उत्तरे धोरणात्मक सुधारणांमध्ये आहेत, केवळ नेतृत्वबदलात नाहीत. कोणतेही सरकार असो, वेळेवर संवाद साधणे, जबाबदारी स्वीकारणे आणि आवश्यक निर्णय घेणे ही चांगल्या प्रशासनाची लक्षणे मानली जातात. विलंबामुळे निर्माण होणारा अविश्वास अनेकदा परिस्थिती अधिक चिघळवतो. त्यामुळे अशा घटनांमधून शासनाने संवादकेंद्रित आणि उत्तरदायी प्रशासनाचा धडा घेणे आवश्यक आहे. या संपूर्ण प्रकरणाकडे राजकीय विजय किंवा पराभव म्हणून पाहण्यापेक्षा, विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण देशाचे भविष्य घडवणाऱ्या तरुणांना त्यांच्या शिक्षणापेक्षा आंदोलनाला प्राधान्य द्यावे लागणे, ही कोणत्याही समाजासाठी अभिमानाची बाब ठरू शकत नाही. शेवटी प्रश्न तोच राहतो विद्यार्थ्यांच्या आवाजाकडे वेळेवर लक्ष दिले असते, तर एवढ्या मोठ्या आंदोलनाची गरज पडली असती का? या प्रश्नाचे उत्तर केवळ एका सरकारने नव्हे, तर भविष्यातील प्रत्येक सरकार आणि प्रशासनाने शोधण्याची गरज आहे. कारण लोकशाहीची खरी ताकद जनतेचा आवाज ऐकण्यात आहे; तो रस्त्यावर उतरल्यावर ऐकण्यात नव्हे.

# १ कोटी ७८ लाखाचा मुद्देमाल जप्त; परतुर मंठामध्ये भांड्याचा घोटाळा; पोलिसांना आरोपी सापडांना?

## कामगार कल्याण विभागात कोट्यवधींचा घोटाळा आ.लोणीकर यांनी केला उघडकीस

जालना। प्रतिनिधी

**कामगार कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये तसेच मोफत संसारोपयोगी भांडी वितरण योजनेत कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार, बनावट लाभार्थी तयार करून शासनाची फसवणूक आणि पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी केला आहे. परंतु या प्रकरणी परतुर आणि मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास करणाऱ्या पोलिसांना अद्याप पर्यंत काही आरोपी सापडले नाही. सदरील तपास स्थानिक गुन्हे शाखा किंवाआर्थिक गुन्हे शाखेकडे देणे गरजेचे आहे. यानंतरच घोटाळा करणारे सगळे आरोपी सापडू शकतात. असे तज्ञसेवा निवृत्त पोलीस अधिकाऱ्याकडून सांगण्यात येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व स्वतंत्र चौकशी करून कामगार कल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार, तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच अमोल जाधव यांना केवळ बदली किंवा निलंबन न करता कायमस्वरूपी शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात यावे, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.**

लोणीकर म्हणाले की, कामगारांच्या नावावर राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस लाभार्थी तयार करण्यात आले. तब्बल ३५ मृत व्यक्तींच्या नावावर शासकीय लाभाची रक्कम उचलण्यात आल्याचा आरोप असून दैठणा (बु.) येथील ५ व्यक्तींना लाभार्थी दाखविण्यात आले असले तरी त्या प्रत्यक्षात त्या गावच्या रहिवासी नसल्याचा दावा करण्यात आला आहे. एका व्यक्तीने दिलेल्या तक्रारीनुसार दैठणा येथील ५ बोगस लाभार्थ्यांच्या नावावर सुमारे १३ लाखांचा अपहार झाला असून, संपूर्ण जालना जिल्ह्यात ३४० कथित बोगस लाभार्थ्यांच्या माध्यमातून मृत्यू सहाय्य, विवाह सहाय्य आणि शिष्यवृत्ती योजनांमध्ये सुमारे ८ कोटी ८४ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. लाभार्थ्यांना रक्कम वितरित झाल्यानंतर कामगार विभागाच्या अधिकृत पोर्टलवरील नोंदी हटवून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर येत असल्याने संपूर्ण पोर्टलची फॉरेन्सिक तपासणी करून सर्व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली. मोफत संसारोपयोगी भांडी वितरण योजनेतही मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत लोणीकर म्हणाले की, लाभार्थ्यांकडून नोंदणी शुल्काच्या नावाखाली पावतीशिवाय पैसे वसूल करण्यात आले, तर अनेक लाभार्थ्यांना भांडी न देता ती दलालांमार्फत विक्रीसाठी वळविण्यात आली. या प्रकरणात परतूर येथे मध्यरात्री एमएच-१२-यूएम-६२५८ क्रमांकाचा ट्रेलर पकडण्यात आला असून त्यामध्ये सुमारे १,२०० भांड्यांचे संच आढळून आले. या कारवाईदरम्यान स्वतः आमदार बबनराव लोणीकर रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी उपस्थित होते. तसेच जगदीश पडूळकर आणि इतर कार्यकर्त्यांनी ट्रक पकडण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात आतापर्यंत तीन स्वतंत्र गुन्हे दाखल झाले असून एकूण १ कोटी ७८ लाख ८१ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परतूर पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ०१८२/२०२६ अंतर्गत १६६ संचांसह १६ लाख २४ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे, मारोती खंदारे, सरिता खंदारे आणि अप्सर शेख यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. यदलापूर येथे एफआयआर क्रमांक ०३४७/२०२६ अंतर्गत ५४ लाख ३७ हजार ०६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे व बंडू केदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर मंठा पोलीस ठाणे हद्दीत एफआयआर क्रमांक ०३९९/२०२६ अंतर्गत १ कोटी ८ लाख १९ हजार ६२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून अनिल मुळे व विठ्ठल नळगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोणीकर यांनी आरोप केला की, कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कारवाईच्या सूचना दिल्यानंतरही कामगार कल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांनी तत्कालीन जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. उलट त्यांना वाचविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न करण्यात आला. संबंधित एजन्सीची नियुक्तीही विवेक कुंभार यांच्या माध्यमातून झाल्याचा आरोप त्यांनी केला. वेळेत अमोल जाधव यांना निलंबित करून संबंधित एजन्सी रद्द केली असती तर तीन-तीन गुन्हे दाखल होण्याची वेळ आली नसती, असे ते म्हणाले. त्यामुळे विवेक कुंभार यांच्या भूमिकेचीही उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. तसेच अमोल जाधव यांना कायमस्वरूपी शासकीय सेवेतून बडतर्फ करून, विवेक कुंभार, संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि एजन्सीविरुद्ध स्वतंत्र एसआयटी किंवा अन्य सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

# जालना जिल्ह्यातील कर्जमाफी पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

## • आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया सुरू

जालना । प्रतिनिधी

**महाराष्ट्र शासनाच्या ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६'' अंतर्गत जालना जिल्ह्यातील पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी २४ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या योजनेत जिल्ह्यातील ९५४ गावांतील पात्र शेतकऱ्यांची नावे समाविष्ट करण्यात आली असून संबंधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालय, गाव चावडी, विविध कार्यकारी सेवा संस्था तसेच संबंधित बँक शाखांमध्ये ही यादी उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

राज्यातील शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांत अनियमित पाऊस, दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि हवामान बदलाच्या परिणामांमुळे मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. उत्पादन खर्चात वाढ, बाजारभावातील चढ-उतार आणि नैसर्गिक संकटांमुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी आणि त्यांना पुन्हा पीक कर्ज उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना मुद्दल व व्याजासह प्रति शेतकरी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. तसेच ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेले आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत न भरलेले कर्ज या योजनेसाठी पात्र राहणार आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. यासाठी शासनाने ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत दिली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी प्रसिद्ध करण्यात आलेल्या यादीतील विशिष्ट क्रमांक, आधार कार्ड आणि बँकेचे पासबुक घेऊन जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात किंवा संबंधित बँक शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. आधार प्रमाणीकरणासाठी शेतकऱ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. आपले सरकार सेवा केंद्र चालकांनीही कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. आधार प्रमाणीकरणाच्या वेळी आधार क्रमांक, बँक खाते क्रमांक किंवा कर्जाच्या रकमेबाबत काही त्रुटी आढळल्यास त्याबाबतची ऑनलाइन तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे नोंदविण्यासाठी सेवा केंद्र चालकांना सांगावे. तसेच बोटांचे ठसे न उमटल्यामुळे आधार प्रमाणीकरण होत नसल्यास त्याबाबतची ऑनलाइन तक्रार तहसीलदारांकडे नोंदविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी वेळेत आधार प्रमाणीकरण करून योजनेचा लाभ घ्यावा तसेच सेवा केंद्र चालकांनी शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करून कोणतेही शुल्क आकारू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना विष्णु रोडगे यांनी केले आहे.

# दारूच्या नशेत शिक्षिका पत्नीवर चाकूने हल्ला; पतीविरुद्ध गुन्हा दाखल

धारूर । प्रतिनिधी

**कौटुंबिक वादातून दारूच्या नशेत पतीने स्वतःच्या शिक्षिका असलेल्या पत्नीवर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत पत्नीच्या उजव्या डोळ्याच्या वर दुखापत झाली असून मारहाण करत जीवे मारण्याची धमकीही देण्यात आली आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी पतीविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.**

ज्ञानदीप विद्यालय येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या ३६ वर्षीय सरिता राजेंद्र बोरकर यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे. त्या तांदळवाडी रोड, धारूर येथे पती राजेंद्र निवृत्ती बोरकर आणि दोन मुलांसह राहतात. २१ जुलै रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास पती राजेंद्र हे दारू पिऊन घरी आले. दारू का प्यायलात असा जाब विचारल्याच्या रागातून त्यांनी पत्नीला शिवीगाळ केली आणि घरात असलेल्या चाकूने उजव्या डोळ्यावर मारून जखमी केले. तसेच लाथांनी कंबरेवर मारहाण करून पुन्हा विचारल्यास गळा दाबून मारण्याची धमकी दिली. भांडणाचा आवाज ऐकून शेजाऱ्यांनी आणि नातेवाईकांनी मध्यस्थी करत सुटका केली. प्रथमोपचारानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार पूर्ण झाल्यानंतर पीडितेने पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात आरोपी राजेंद्र निवृत्ती बोरकर विरुद्ध बीएनएस कलम ११५(२), ११८(१), ३५१(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस शिपाई रेवणनाथ दुधाणे करत आहेत.




## पान १ वरून...

### राज्यात चांगला पाऊस

चरणी प्रार्थना केली, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी पंढरपूरमध्ये बोलताना सांगितले. सोबतच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाच्या तरुणाईकरिता एक नवीन अध्याय सुरु केलेला आहे. तरुणाईला दिशा देण्यासाठी, त्यांच्या आशा-आकांशा पूर्ण करण्याकरिता मोदी नवीन अध्याय लिहित आहेत. त्यात त्यांना आशीर्वाद पांडुरंगाने द्यावा, अशीही विठुरायाच्या चरणी प्रार्थनी केल्याचे त्यांनी म्हटले. दरम्यान, यंदा शासकीय महापूजेसाठी मानाचे वारकरी म्हणून धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यातील गौरगावमधील शेतकरी दाम्पत्य बाळासाहेब माने आणि प्रभावती माने यांना मिळाला. माने हे गेल्या २० वर्षे आळंदी ते पंढरपूर अशी पायी वारी करत आहेत. त्यांचा सत्कार मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कारही प्रदान करण्यात आला.

---------

### अखेर सरकार झुकले

असल्याचे स्पष्ट केले होते. त्यानंतर काही तासांनी, धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडियावर एका सविस्तर पोस्टद्वारे राजीनाम्याची घोषणा क४ली. यामुळे जंतरमंतरवर जिथे कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी बेमुदत उपोषण सुरू केले होते आणि जिथे आंदोलकांना हक्काचे ठिकाण मिळाले होते तिथे आनंदाचे वातावरण पसरले. धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून स्वतःहून राजीनामा दिला; त्यांना पदावरून हटवण्यात आले नाही. यावरून असे दिसून येते की सरकार त्यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यास उत्सुक होते. मूळचे ओडिशाचे असलेले भाजप नेते धर्मेंद्र प्रधान यांनी २०२१ मध्ये पहिल्यांदा शिक्षण मंत्री म्हणून पदभार स्वीकारला होता आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाचा विजय झाल्यानंतर त्यांची पुन्हा नियुक्ती करण्यात आली होती. नीट परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटण्याच्या (पेपर लीक) अनेक घटनांमुळे टीकेचे धनी ठरलेल्या धर्मेंद्र प्रधान यांनी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले की, पद सोडणे ही ''वैयक्तिक प्रतिष्ठेची बाब'' नाही. मे महिन्यातील पेपर लीकची घटना धर्मेंद्र प्रधान यांच्यासाठी अखेरची आणि निर्णायक ठरल्याचे दिसते. ''गेल्या दहा दिवसांतील घडामोडींमुळे मला खूप दुःख झाले आहे. माझ्यासाठी ही वैयक्तिक प्रतिष्ठेची बाब नाही,'' असे ते म्हणाले. त्यानंतरच्या वाक्यात त्यांनी ठामपणे सांगितले की, ''भारताचे तरुण हीच देशाची खरी ताकद आहेत.''




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २६ जुलै २०२६
३

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यात पशुधन आरोग्य शिबिर




**वडवणी । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.पर्यावरण अबाधित राहावे यासाठी घनवन पद्धतीने वृक्षारोपण पाच हजार झाडे लावण्यात येणार आहेत हा कार्यक्रम रुई पिंपळा या ठिकाणी दि २६ जुलै रोजी सकाळी १० वा. होणार आहे तसेच चिखलबीड येथे सोमवार, दि. २७ जुलै रोजी सकाळी १० वा. भव्य पशुधन आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील पशुपालकांना त्यांच्या जनावरांसाठी तज्ज्ञ पशुवैद्यकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, या शिबिराचा लाभ तालुक्यातील शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी केले आहे.**

शेतकऱ्यांच्या शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पशुपालनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जनावरांचे आरोग्य चांगले राहिल्यास दूध उत्पादनात वाढ होण्यासह पशुपालकांचे आर्थिक उत्पन्नही वाढते. याच पार्श्वभूमीवर या शिबिरामध्ये पशुशस्त्रक्रिया, लंपी रोगावरील प्रतिबंधात्मक लसीकरण, वंध्यत्व तपासणी व उपचार, विविध संसर्गजन्य व इतर आजारांची तपासणी, औषधोपचार तसेच मोफत चारा बियाण्यांचे वाटप करण्यात येणार आहे. अनुभवी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून पशुपालकांना जनावरांच्या संगोपनाबाबत आवश्यक मार्गदर्शनही दिले जाणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार केशवदादा आंधळे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा नेते माजलगाव मतदार संघ माधव निर्मळ, उपनगराध्यक्ष बस्सीधर मुंडे, माजी सभापती दिनकरराव आंधळे, भाजपा नेते सोमनाथ बडे, भाजपा जिल्हा सचिव मच्छिंद्र झाटे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेड्डे, विश्वनाथ झाटे, अंकुश वारे, उपसभापती अनिल चोले तसेच डॉ.रोहिदास खोटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या शिबिरासाठी डॉ. इंगोले जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी, डॉ. बी. बी. कांबळे पशुचिकित्सक वडवणी, यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील तज्ज्ञ पशुवैद्यकीय अधिकारी व डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार असून, जनावरांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन करणार आहे. या शिबिराचे आयोजन भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय केशवराव आंधळे यांनी केले आहे. ग्रामीण भागातील पशुपालकांना शासनाच्या पशुसंवर्धन योजनांची माहिती, आधुनिक पशुपालनाबाबत मार्गदर्शन आणि दर्जेदार आरोग्य सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. चिखलबीड व परिसरातील तसेच वडवणी तालुक्यातील सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांसह या शिबिरात उपस्थित राहून मोफत पशुवैद्यकीय सेवा, लसीकरण आणि उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी केले आहे.


# लोकनेत्याचा खरा वारसा

**महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या कर्तृत्वाने, आक्रमक नेतृत्वाने आणि जनमानसातील अढळ स्थानाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या नेत्या म्हणजेच मा. पंकजाताई मुंडे... लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा राजकीय आणि सामाजिक वारसा तितक्याच ताकदीने पुढे नेणाऱ्या पंकजाताईंनी केवळ 'वारसदार' म्हणून नाही, तर स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या राजकारणात आपले स्थान निर्माण केले आहे.**

लोकनेते मुंडे साहेबांच्या मुशीत घडलेल्या पंकजाताईंनी राजकारणाचे धडे घरातूनच गिरवले. मात्र, त्यांच्यातील नेतृत्वाची खरी चुणूक २००९ मध्ये महाराष्ट्राने पाहिली, जेव्हा त्यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकत विधानसभेत पाऊल ठेवले. मुंडे साहेबांच्या अचानक जाण्याने निर्माण झालेली मोठी पोकळी आणि दुःख पचवत, त्यांनी केवळ स्वतःलाच सावरले नाही, तर मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्रातील लाखो कार्यकर्त्यांना आणि वंचित, उपेक्षित, कष्टकरी ऊसतोड कामगारांना धीर दिला.

२०१४ ते २०१९ या काळात राज्याच्या ग्रामविकास, जलसंधारण, महिला व बालकल्याण मंत्री म्हणून त्यांनी केलेली कामगिरी अत्यंत उल्लेखनीय ठरली. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी जलयुक्त शिवार योजनेसाठी त्यांनी घेतलेला पुढाकार अत्यंत महत्त्वाचे ठरला. मुख्यमंत्री ग्रामसडक योजने*च्या माध्यमातून ग्रामीण भागातील रस्ते मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे मोठे काम त्यांच्या कार्यकाळात झाले. *महिला बचत गटांना बळ देणे आणि ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांनी विशेष योजना राबवल्या.

राजकारणात चढ-उतार हे येतच असतात. काही काळाचा राजकीय संघर्ष आणि पराभवाचा सामना करावा लागला तरी पंकजाताई कधीही खचल्या नाहीत. माझा जनतेवर आणि जनतेचा माझ्यावर विश्वास आहे, हाच त्यांचा मूलमंत्र राहिला आहे. त्यांनी सातत्याने जनतेशी, विशेषतः मराठवाडा आणि महाराष्ट्रातील वंचित, ऊसतोड कामगार व बहुजन



समाजाशी आपली नाळ कायम जोडलेली ठेवली. त्यांच्या याच जनमानसातील प्रभावाची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर राष्ट्रीय पातळीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिवपदाची जबाबदारी सोपवली आणि मध्यप्रदेश राज्याचे सहप्रभारी केले, इथेही त्यांनी आपल्या संघटन कौशल्याचा ठसा उमटवला. बीड लोकसभेत निसटते अपयश आल्यानंतर पुढे त्यांना विधानपरिषदेवर प्रतिनिधित्व करण्याची संधी देत राज्यात कॅबिनेट मंत्रीपदाची जबाबदारी सोपवली. मंत्रिमंडळातील खातं कोणतंही असो, त्याला आपल्या अभ्यासपूर्ण आणि नियोजनबद्ध कामकाजातून एक वेगळी ओळख देण्याचं काम त्यांनी केलं.

पर्यावरण व पशुसंवर्धन खात्याच्या मंत्री म्हणून त्यांच्या जबाबदारीला आज जवळपास दीड ते दोन वर्षे होत आहेत. या कालावधीत अनेक चांगले निर्णय घेऊन त्यांनी पर्यावरण व पशुसंवर्धन खात्याला एक वेगळा आयाम देण्याचा प्रयत्न केला आहे, पशूसंवर्धन व्यवसायाला कृषीचा दर्जा, अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या, परळी व बारामती येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय, ग्रामीण भागातील तरूण उद्योजक व्हावेत यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना, नदी पुनरुज्जीवन प्राधिकरण अशा कितीतरी नव नवीन योजनेतून त्यांची सामान्य जनतेप्रती असलेली तळमळ दिसून येते.

- **वंचितांची माऊली**

गोपीनाथराव मुंडे साहेबांनंतर ऊसतोड कामगारांचे प्रश्न हिरीरीने मांडणारे नेतृत्व म्हणून पंकजाताईंकडे पाहिले जाते. दरवर्षी दसरा मेळाव्याच्या निमित्ताने सावरगाव येथील भगवान भक्तीगडावरून त्या लाखो कार्यकर्त्यांशी संवाद साधतात. हा दसरा मेळावा केवळ राजकीय नसून, तो ऊसतोड कामगार, वंचित आणि कष्टकऱ्यांच्या हक्काचा आवाज बनला आहे. पंकजाताई मुंडे या केवळ एक राजकारणी नाहीत, तर त्या एक उत्तम वक्त्या, संघटक आणि संवेदनशील समाजसेविका आहेत. तरुणांशी संवाद साधताना त्या तितक्याच आधुनिक वाटतात, जितक्या ग्रामीण भागातील वृद्धांशी संवाद साधताना त्या घरच्या लेकीसारख्या वाटतात. सर्वसमावेशक नेतृत्व आणि सर्वपक्षीय नेत्यांशी असलेले सलोख्याचे संबंध ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे. थोडक्यात सांगायचे तर, पंकजाताई मुंडे यांचे नेतृत्व हे केवळ सत्तेभोवती फिरणारे नाही, तर ते संघर्षातून तावून सुलाखून निघालेले नेतृत्व आहे. मुंडे साहेबांच्या वंचित, उपेक्षित घटकाच्या विकासाचा विचार पुढे नेणाऱ्या सर्वांच्या लाडक्या ताईसाहेब येणाऱ्या काळातही महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत राहतील यात शंका नाही, त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, हिच याप्रसंगी शुभकामना..!

**प्रदीप कुलकर्णी**

## आषाढी एकादशीनिमित्त फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीची माजलगावात दिंडी


**माजलगाव । प्रतिनिधी**

**जाती-धर्माच्या भिंती तोडून समता, बंधुता आणि विठ्ठलभक्तीचा संदेश देणारा वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा पाठीचा कणा आहे. हाच थोर वारसा आणि संस्कार बालवयातच विद्यार्थ्यांच्या मनात रुजावेत, या उद्देशाने शहरातील नामांकित फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी' (भाटवडगाव) च्या वतीने आषाढी एकादशीचे औचित्य साधून भव्य 'पायी दिंडी' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

मागील ११ वर्षांपासून सुरू असलेली ही अखंड परंपरा यंदाही अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.या निमित्ताने १००० हून अधिक बालवारकऱ्यांनी महाराष्ट्राचा वारकरी संस्कृतीचा वारसा जपला त्याच बरोबर सामाजिक संदेशाने वेधले नागरिकांचे लक्ष वेधले.माऊलींच्या जयघोषाने माजलगाव नगरी दुमदुमली शाळा परिसर ते बायपास मुख्य रस्त्यावरील मंगलनाथ मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या या पायी दिंडीत इयत्ता २ री ते १० वीचे जवळपास ७०० विद्यार्थी प्रत्यक्ष वारकरी वेशात सहभागी झाले होते. याशिवाय पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागासह एकूण १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी या पायी दिंडी सोहळ्यात हजेरी लावली.सजलेली पालखी सुंदर हार-फुलांनी सजवलेली विठ्ठल-रुक्मिणीची पालखी हे या दिंडीचे मुख्य ठरले.वारकरी रूप हातात टाळ-मृदंग, डोक्यावर तुळशीवृंदावण, कपाळावर गोपीचंदन अन् मुखात ज्ञानबा-तुकाराम व विठ्ठल-विठ्ठल विठ्ठला चा गजर करत लहानग्या वारकऱ्यांनी अवघी माजलगाव नगरी भक्तिरसात न्हाऊन काढली.




























# १०टक्के पेक्षा जास्त पावसाची तूट असेल तर खरीप उत्पादनावर परिणाम : केंद्र सरकारची माहिती

दिल्ली / वृत्तसंस्था

देशात मॉन्सून हंगामातील पावसात १० टक्क्यांपेक्षा अधिक तूट निर्माण झाल्यास खरीप हंगामातील अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होत असल्याची माहिती केंद्र सरकारने राज्यसभेत दिली आहे. मात्र, सिंचनाचा विस्तार, दुष्काळ सहन करणाऱ्या वाणांचा वापर, सुधारित हवामान अंदाज आणि सरकारी हस्तक्षेपामुळे अलिकडच्या काळात पावसाच्या तुटीचा उत्पादनावरील परिणाम काही प्रमाणात कमी झाल्याचेही सरकारने स्पष्ट केले.

राज्यसभेत हवामान बदल आणि मॉन्सूनमधील अनिश्चिततेचा अन्नसुरक्षेवर होणाऱ्या परिणामाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ''देशात मॉन्सून हंगामात १० टक्क्यांहून अधिक पावसाची तूट असेल, तर त्याचा खरीप अन्नधान्य उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. विशेषतः १९८२, १९८७, २००२, २००४, २००९, २०१४ आणि २०१५ ही दुष्काळी किंवा एल निनोची वर्षे होती. या काळात देशात १२ ते २२ टक्क्यांपर्यंत पावसाची तूट नोंदवली गेली आणि त्याचा खरीप उत्पादनावर विविध प्रमाणात परिणाम झाला. मात्र, अलिकडच्या



वर्षांत या परिणामाची तीव्रता कमी झाली आहे.'' असा दावा त्यांनी केला. यामागे सिंचनाखालील क्षेत्रात वाढ, सुधारित व दुष्काळ सहन करणाऱ्या वाणांचा प्रसार, हवामान अंदाज आणि कृषी सल्ला सेवा, निविष्ठांची उपलब्धता, सुधारित पीक व्यवस्थापन, राज्यांचे आकस्मिक नियोजन आणि केंद्र सरकारच्या विविध उपाययोजना कारणीभूत असल्याचे सरकारने सांगितले. तसेच सरकारने स्पष्ट केले की, २०२६-२७ च्या खरीप हंगामातील पेरण्या अद्याप सुरू आहेत. त्यामुळे या हंगामातील प्रमुख खरीप पिकांच्या पहिल्या आगाऊ उत्पादन अंदाजाची घोषणा अद्याप झालेली नाही. दरम्यान, देशातील मॉन्सून हंगामातील पावसाच्या तुटीमुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. पावसाचं वितरण असमान असल्याने अनेक भागात जोरदार पावसाची प्रतिक्षा कायम आहे.

केंद्र सरकारने कापूस उत्पादनातील घटीचे कारणही स्पष्ट केले. वस्त्रोद्योग राज्यमंत्री पबित्रा मार्गेरिटा यांनी सांगितले की, कापूस लागवडीखालील क्षेत्र कमी होऊन काही शेतकरी अधिक फायदेशीर पिकांकडे वळल्यामुळे उत्पादनात घट झाली आहे. त्यांनी दिलेल्या लेखी उत्तरात, २०२०-२१ मध्ये देशात ३५२.४८ लाख गाठी कापसाचे उत्पादन झाले होते. ते २०२५-२६ मध्ये २९०.९१ लाख गाठींवर आले आहे. मात्र, या काळात कापसाची उत्पादकता ४२८ ते ४५१ किलो प्रति हेक्टर या मर्यादेत स्थिर राहिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी पुढे सांगितले की, या कालावधीत आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाच्या किमती सुमारे १९ टक्क्यांनी, तर देशांतर्गत एस-६ जातीच्या कापसाच्या किमती सुमारे १८ टक्क्यांनी वाढल्या. गरजेनुसार देशांतर्गत उपलब्धता वाढवण्यासाठी कच्चा कापूस आणि कापूस सूत आयात केले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## गाय-म्हैस आजारी पडल्याचे लक्षणावरून येते ओळखता

राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी दुग्ध व्यवसायासोबत जोडले गेले आहे. दूध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातील एक म्हणजे दुधाळ जनावर आजारी असल्यास बऱ्याच शेतकऱ्यांच्या लक्षात येत नाही. ज्यामुळे असे जनावर आपले आजारपण अंगावर काढत असते. अशा वेळी दूध उत्पादनात मोठी घट होऊन शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागते. मात्र, अशी काही लक्षणे असतात की शेतकरी आपल्या दुधाळ जनावराचे निरीक्षण करून ओळखू शकतात की ते आजारी आहे की नाही?

एक दूध उत्पादक शेतकरी म्हणून, शेतकऱ्यांनी नेहमी आपल्या दुधाळ जनावराकडे बारकाईने लक्ष ठेवले पाहिजे. कारण जनावरे आपल्या आजाराबाबत बोलून सांगू शकत नाही. अशा वेळी १२ लक्षणे असतात, जी शेतकऱ्यांना आपल्या दुधाळ जनावराचे आजारपण सांगू शकतात. शेतकऱ्यांनी या १२ लक्षणाबाबत नेहमी आपल्या जनावरांवर लक्ष ठेवल्यास त्यांना दोन फायदे होतात. पहिला फायदा म्हणजे एखादे दुधाळ जनावर आजारी पडल्यास, तुम्ही त्याला इतर जनावरांपासून बाजूला बांधू शकता. ज्यामुळे तुम्हाला संबंधित आजाराचा फैलाव होण्यापासून वेळीच रोखता येईल. आणि दुसरा फायदा म्हणजे तुम्ही अशा जनावरावर तात्काळ इलाज करून, आपल्या दुधात होणारी घट थांबवू शकता. यामुळे तुमचे आर्थिक नुकसान होणार नाही.

'ही' आहेत १२ लक्षणे : एखाद्या जनावराच्या चालण्यात, व्यवहारात आणि हावभावांमध्ये बदल दिसून येणे हे त्याच्या आजारी असण्याचे लक्षण असते. एखादे दुधाळ जनावर चारा खात नसेल,



रवंथ करत नसेल किंवा मग अन्य जनावरांपासून दूर एकटे राहत असेल तर ते जनावर आजारी असू शकते. एखाद्या जनावराच्या दुधात अचानक घट दिसून आल्यास ते आजारी असू शकते. कधी कधी काही जनावरे नेहमीपेक्षा शांत होतात. त्यांच्या अंगावरील केस सरळ उभे होतात. हे सुद्धा आजारपणाचे लक्षण आहे. एखादे दुधाळ जनावर आपली मान खाली जमिनीला लावून उभे राहत असेल तर अशा जनावरांमध्ये अशक्तपणा प्रतीत होतो. शक्यतो शेतकऱ्यांना नेहमी आपल्या जनावरांच्या पाठीवर हात ठेवला पाहिजे. यातून जनावरांचा ताप लक्षात येतो. जनावरांच्या नाक, कान आणि डोळ्यातून पाणी येणे हे सुद्धा जनावर आजारी असल्याचे दर्शवते. याशिवाय एखाद्या दुधाळ जनावराचे शेण हे खूप पातळ किंवा कडक येत असेल तर ते सुद्धा आजारी असल्याचे महत्वाचे लक्षण मानले जाते. इतकेच नाही तर कधी कधी जनावरांच्या डोळ्यांना मोठी चिपाडे येतात. हे देखील आजारपणाचे लक्षण आहे. जनावर आपल्या तोंडातून पांढरी लाळ गाळत असेल तर ते निश्चितपणे आजारी असते. याशिवाय चालताना लंगडत-लंगडत चालत असेल तर असे जनावर आजारी असते. एखादे जनावर आजारी असल्यास सर्वात मोठे लक्षण म्हणजे, त्याच्या वजनात किंचित घट दिसून येते.

## मुऱ्हा सर्वाधीक फायदा देणारी म्हशीची जात

राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात शेतकरी दूध व्यवसाय करत आहेत. परंतु दूध व्यवसायात यशस्वी होण्यासाठी जातिवंत जनावराची निवड, दुधाला योग्य दर, दूध व्यवसायाच्या योग्य नियोजनासह सकस चाऱ्याची उपलब्धता या गोष्टींची आवश्यकता असते. आपल्याकडे या सर्व गोष्टी जुळून आल्या की दूध व्यवसायात ९० टक्के यशाची खात्री ही तुम्हाला आधीच मिळालेली असते. त्यामुळे आता तुम्हीही दुधाळ जनावरांच्या शोधात असाल तर म्हशीची 'मुऱ्हा' ही सर्वाधिक दूध देणारी प्रजाती तुमच्यासाठी उत्तम ठरू शकते.

किती देते दूध? कोणतेही दुधाळ जनावर खरेदी करताना आपल्या मनात सर्वात पहिला प्रश्न निर्माण होतो की दूध किती देते? मात्र मुऱ्हा ही म्हशीची अशी जात आहे जिच्या पालनातून तुम्ही स्वतःची आणि कुटुंबाची आर्थिक भरभराट करू शकतात. ही म्हैस दररोज सरासरी २५ ते ३० लिटर दूध देते. उत्तरेकडील हरियाणा, पंजाब या राज्यामध्ये मुऱ्हा ही जातिवंत म्हैस मिळू शकते. याशिवाय उत्तरेकडील बऱ्याच राज्यांमध्ये शेतकऱ्यांनी या म्हशीच्या पालनातून मोठी आर्थिक उलाढाल केली आहे. या म्हशीच्या दुधाच्या गुणवत्तेमुळे ती दही, ताक, तूप आणि लोणी यांसारखे अनेक प्रकारचे दुग्धजन्य पदार्थ बनवण्यासाठी योग्य मानली जाते.

शेतकऱ्यांची पहिली पसंती : मुऱ्हा म्हैस ही म्हशीची जात सध्यस्थितीत प्रामुख्याने पंजाब, हरियाणा आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे जास्त प्रमाणात आढळते. एक मुऱ्हा म्हैस दिवसाला २५ लिटर दूध देते. त्यामुळे तुम्ही या म्हशींच्या पालनातून दररोजची मोठी कमाई हमखास करू शकतात. इतकेच नाही तर महाराष्ट्रात पंढरपुरी म्हैस आणि सुरती म्हैस यांचा देखील दूध देण्याचा आलेख



चांगला आहे. मात्र मुऱ्हा म्हशीच्या दुधामध्ये चरबी स्निग्धाचा अंश जास्त असून, तो ७ टक्के इतका आढळतो. त्यामुळे दूध उत्पादनाकांची मुऱ्हा म्हैशीला पहिली पसंती असते.

मुऱ्हा म्हशीची वैशिष्ट्ये : मुऱ्हा जातीच्या म्हशीचे शरीर गडद काळे असते. चेहऱ्यावर आणि पायावरही पांढरे डाग दिसतात. पाठीत बाक अर्थात कुबड असते. पण कुबडाचा भाग हलकासा वर आलेला असतो. डोके लांब असते, शेपटी गुडघ्यापर्यंत लांब असते आणि पाय लहान व मजबूत असतात. या जातीच्या म्हशीचे सरासरी वजन ४५० किलो आणि उंची सुमारे १३२ सेमी असते. या जातीच्या रेड्याचे सरासरी वजन ५५० किलो आणि उंची सुमारे १४२ सेमी असते. एका वेताला १६००-१८०० लिटर दूध देते. एका वेताला ३१० दिवस दूध देण्याची क्षमता असते. विशेष काळजी घेतल्यास या जातीच्या म्हशी अधिक दूध देतात. शिवाय या जातीच्या म्हशीच्या दुधाला ७ टक्क्यांपर्यंत फॅट मिळतो. या म्हशीची पारडी ४५ ते ५० महिन्यांच्या वयात पहिल्यांदा दूध देण्यास सुरुवात करते. पारडी लहान असताना योग्य ती काळजी घेतल्यास हा कालावधी ३६ ते ४० महिने इतका कमी देखील होऊ शकतो.

## एलुविरा (कोरफड) लागवड तंत्रज्ञान

याचे नाव अलोएवेरा हे अरबी शब्द अलोह वरून आले आहे, ज्याचा अर्थ चमकणारा कडू पदार्थ असा होतो. पानांच्या आतील भागात असलेला गर आणि चीक विविध औषधे तयार करण्यासाठी वापरला जातो. यामध्ये जीवनसत्त्वे ए, बी १, बी २, बी ६, बी १२, फॉलिक ॲसिड, नियासिन असतात. अलोएवेरापासून बनवलेली औषधे भाजणे आणि उन्हामुळे त्वचा जळणे, तसेच एक्झिमा, खाज, सोरायसिस, मुरुमे इत्यादी विविध त्वचारोगांवर वापरली जातात. ही एक खोड नसलेली वनस्पती असून तिची सरासरी उंची २४ सेमी ते ३९ सेमी असते आणि तिची पाने जाड व मांसल असतात. पानांची उंची ०.५ मीटरपर्यंत वाढते. अलोएवेराची प्रमुख लागवड क्षेत्रे भारत, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जपान आणि युरोप आहेत. भारतात ही वनस्पती पंजाब, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, गुजरात, हरियाणा, झारखंड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मिझोराम, नागालँड, ओरिसा, राजस्थान, उत्तरांचल या राज्यांमध्ये आढळते.

जमीन : ही वनस्पती किनारी भागातील वालुकामय जमिनीपासून ते मैदानी प्रदेशातील चिकणमातीपर्यंत विविध प्रकारच्या जमिनीत वाढवता येते. ती पाणथळ परिस्थितीत तग धरू शकत नाही. ८.५ पर्यंत पीएच असलेल्या, चांगला निचरा होणाऱ्या चिकणमाती ते जाडसर वालुकामय चिकणमातीच्या जमिनीत वाढवल्यास सर्वोत्तम परिणाम मिळतात.

लोकप्रिय वाण आणि त्यांचे उत्पन्न :लिलियासी कुळात कोरफडीच्या सुमारे १५० प्रजाती आहेत. त्यापैकी ॲलो बार्बेडेंसिस, ॲलो चायनेन्सिस, ॲलो पर्फोलियाटा, ॲलो वल्गारिस, ॲलो इंडिका, ॲलो लिटोरॅलिस आणि ॲलो अबिसिनिका या सामान्यतः लागवड केल्या जाणाऱ्या जाती असून त्या सर्वाधिक औषधी गुणधर्म असलेल्या आहेत.

जमिनीची तयारी :कोरफडीची मुळे २०-३० सें.मी. खाली जात नाहीत, म्हणून जमिनीच्या



प्रकारानुसार जमीन पूर्णपणे नांगरून भुसभुशीत करा. शेवटच्या नांगरणीच्या वेळी जमिनीत प्रति एकर ६ टन चांगले कुजलेले शेण घाला. ४५ किंवा ६० सें.मी. अंतरावर कोंब लावण्यासाठी सरी व बांध घाला. गरज भासल्यास शेताला पाणी द्या. ४० किंवा ३० सें.मी. अंतरावर कोंब लावा.

पेरणीची वेळ :चांगल्या वाढीसाठी जुलै-ऑगस्टमध्ये कोंब लावा. सिंचनाच्या परिस्थितीत, हिवाळ्याचे महिने वगळता वर्षभर पेरणी करता येते.

अंतर :साधारणपणे ४५ सेंमी ४० सेंमी किंवा ६० सेंमी ३० सेंमी अंतर ठेवले जाते.

वापरले जाणारे भाग :कोरफड मिळवण्यासाठी, पाने बुडाशी कापून त्यातील पिवळा, कडू रस काढून घेतला जातो. रसाला उष्णता देऊन त्यातील पाणी वाफेने काढून टाकले जाते, ज्यामुळे हलका ते गडद तपकिरी रंगाचा लगदा मिळतो.

बियाणे प्रक्रिया :लागवडीसाठी निरोगी कोंबांचा वापर करावा. लागवडीसाठी ३-४ महिने जुने, ४-५ पाने असलेले कोंब वापरले जातात.

खत व्यवस्थापन :जमीन तयार करताना, प्रति एकर ६०-८० क्विंटल चांगले कुजलेले शेण वापरा. युरिया ४४ किलो, सुपर फॉस्फेट १२५ किलो आणि एमओपी ३४ किलो प्रति एकर या स्वरूपात एन:पी:के२०:२० किलो प्रति एकरचा पायाभूत डोस द्या. तण नियंत्रण :तण काढा आणि मातीची भरणी करून शेत तणमुक्त ठेवा. तण काढणी योग्य अंतराने केली पाहिजे. तण काढणी प्रामुख्याने वर्षातून दोनदा केली जाते.

सिंचन :उन्हाळ्यात किंवा कोरड्या परिस्थितीत, दर दोन आठवड्यांनी पाणी द्यावे. पावसाळ्यात पाण्याची गरज नसते आणि हिवाळ्यात कमी पाणी द्यावे, कारण वनस्पती जास्त पाणी शोषून घेत नाही. कोंब लावल्यानंतर लगेचच पहिले पाणी द्यावे. शेताला जास्त पाणी देऊ नका, कारण ते पिकांसाठी हानिकारक असते. लक्षात ठेवा की पिकांना पुन्हा पाणी देण्यापूर्वी शेत आधी कोरडे होऊ द्यावे. पाणी देण्यापूर्वी मलनिस्सारण करावे, जेणेकरून अतिरिक्त पाणी वाहून जाईल.

कीड आणि त्यांचे नियंत्रण :पिठ्या कीड -: लेपिडोसेफॅलस आणि स्यूडोकोकसमुळे होतो. पाने पिवळी पडू लागतात आणि सुकतात. १० लिटर पाण्यात १० मिली मिथाइल पॅराथियॉन किंवा २० मिली क्विनाल्फॉस मिसळून झाडाच्या मुळांवर आणि फांद्यांवर लावावे.

पानांवर काळे तपकिरी ठिपके - काळे तपकिरी पानांवरील ठिपके: काळ्या तपकिरी ठिपक्यांचे वैशिष्ट्य म्हणजे लालसर-तपकिरी रंगाचे बीजाणू, जे अंडाकृती किंवा लांबट पुटकुळ्यांमध्ये आढळतात. जेव्हा पुरेसा ओलावा उपलब्ध असतो आणि तापमान सुमारे २० असते, तेव्हा हा रोग वेगाने वाढू शकतो. परिस्थिती अनुकूल असल्यास, दर १०-१४ दिवसांनी युरेडीनिओस्पोअर्सच्या पिढ्यानपिढ्या तयार होऊ शकतात.अँथ्रॅकनोज - हा एक असा रोग आहे ज्यामुळे फांद्या सुकणे, फांद्यांवर व्रण, डाग, पाने गळणे आणि कोंब करपा यांसारखे अनेक आजार होतात. ७०% कडुलिंबाच्या तेलाची फवारणी केल्याने या रोगातून बरे होण्यास मदत होते.कापणी :कोरफडीच्या पिकाला पूर्ण परिपक्व होण्यासाठी १८-२४ महिने लागतात. वर्षभरात याला पिवळ्या रंगाची फुले येतात. याची काढणी वर्षातून ४ वेळा करता येते. प्रत्येक रोपातून ३-४ पाने तोडावीत. ही तोडणी सकाळी किंवा संध्याकाळी करावी. पाने पुन्हा उगवतात आणि त्यामुळे ५ वर्षांपर्यंत पिकाची काढणी करता येते.

कापणीनंतर : नुकतीच काढलेली वनस्पती वाहतूक करण्यापूर्वी शेतातच कोमेजून त्यातील ओलावा कमी होऊ द्या. साधारणपणे २४ ते ७२ तासांत वनस्पती कोमेजल्याचे लक्षात येते. परंतु, आंबवणे किंवा बुरशीची वाढ रोखण्यासाठी वनस्पती कोरड्या आणि थंड जागी ठेवली पाहिजे. यासाठी सावलीखालील सिमेंटच्या फरशीचा वापर करता येतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वतःवर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित ''मिसाईल मॅन'' म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती





# महाराष्ट्र पत्रकार संघाकडून आषाढीनिमित्त वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना फराळ वाटप

मंठा। प्रतिनिधी

पंढरीची वारी म्हणजे सेवाभाव, भक्ती, ईश्वरीय शक्ती आणि एकतेचे प्रतीक मानले जाते. सेवा आणि भक्तीतून पांडुरंगाचे दर्शन होते तसेच सत्कार्यातून अध्यात्मिक समाधान मिळते असा उपदेश ह.भ.प. राम महाराज यांनी केला. आषाढी एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने* वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते अंकुशराव अवचार, ज्येष्ठ पत्रकार पंडितराव बोराडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी कुलकर्णी, संतोष दायमा, रमेश देशपांडे, विजयकुमार देशमुख, आसाराम शेळके यांच्यासह विश्वनाथराव बोराडे, नारायण दादा बोराडे, दिलीप जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रारंभी पांडुरंगाचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना ह भ प राम महाराज म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने प्रत्येक आषाढी एकादशीला सेवाभाव म्हणून फराळ वाटपाचा हा स्तुत्य उपक्रम अखंडपणे सुरू केलेला आहे. यामधून त्यांचा सेवाभाव दिसून येतो असा गौरवपूर्ण उल्लेख केला. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते.पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करून आषाढीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अंकुशराव अवचार म्हणाले की, संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकोबाराय यांनी आपल्या अभंगातून दिलेला संतोपदेश आजही आपल्याला माणुसकी, सेवा आणि भक्तीचा मार्ग दाखवतो. धार्मिक कार्यातून मनुष्याला जगण्याची प्रेरणा आणि समाजाप्रती कर्तव्याची जाणीव होते असे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी दिंडी, कीर्तन आणि वारीच्या संस्कारातून घडत आहेत. अशा विद्यार्थ्यांना मदत करणे हीच खरी विठ्ठलसेवा असल्याचे पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी कुलकर्णी यांनी सांगितले. पत्रकार रमेश देशपांडे यांनी उत्कृष्ट शैलीतून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य आणि वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी हरीश जोशी,विश्वभर कुलकर्णी,प्रसाद लोखंडे,अर्पित जोशी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर सर्वांनी सामूहिकपणे विठ्ठल नामाचा गजर केला. अभंग आणि गवळणीने वातावरण भक्तीमय झाले होते.

## रिक्षात लिफ्ट देण्याच्या बहाण्याने तरुणावर चाकूहल्ला करून लुटले

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जेवणासाठी मध्यरात्री पायी चाललेल्या रिक्षावाल्याने आग्रहाने बसवून थोडे पुढे सोडले. रिक्षातून उतरताच मागून आलेल्या तिघांनी रिक्षाचे भाडे दे म्हणत चाकूने वार करून लुटले. ही घटना सिडको बसस्थानक परिसरातील बिर्याणी हाऊस हॉटेलसमोर घडली. याप्रकरणी एमआयडीसी सिडको ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शैलेश गणेशराव पायमोडे (३४, रा. भानुदासनगर, जवाहरनगर कॉलनी) यांच्या तक्रारीनुसार, ते रात्री १ वाजेच्या सुमारास सिडको बसस्थानक परिसरातील बिर्याणी हाऊस येथे जेवणासाठी पायी चालले होते. त्याचवेळी त्यांच्याजवळ एक रिक्षावाला आला आणि रिक्षात बस, मी तुला सोडून देतो, असे म्हणाला. शैलेश यांनी मला येथेच जवळ जायचे आहे, मी पायी जातो, असे सांगितले. मात्र रिक्षावाल्याने आग्रहाने बसण्यास सांगितल्याने ते रिक्षात बसले आणि थोडे पुढे गेल्यावर उतरले. रिक्षातून उतरताच त्यांच्या मागून तीन लुटारू आले आणि त्यांनी रिक्षाचे भाडे मागितले. मला रिक्षावाल्याने पैसे मागितले नाहीत, तुम्ही कोण मागणार? असे शैलेश म्हणाले. तरीही वाद नको म्हणून त्यांनी खिशातून काढून ५० रुपये त्यांना दिले. मात्र पैसे मिळताच या तिघांनी शैलेश यांना खाली पाडून शिवीगाळ सुरू केली. एकाने चाकू काढून शैलेश यांच्यावर वार करून त्यांना जखमी केले. खिशातील पाकीट, त्यातील १७२० रुपये, मोबाईल आणि इअरबड्स असा १२ हजार ४२० रुपयांचा ऐवज लुटून पसार झाले. पुढील हवालदार संजय नंद करत आहेत.

दरम्यान, शहरात रात्री पोलिसांनी गस्त नेमकी कुठे सुरू असते, हा प्रश्न वारंवार विचारला जात आहे. सिडको चौक परिसरात लूटमार, चाकूहल्ल्याच्या वारंवार घटना घडत आहेत. रस्त्यावर नशेखोर, लुटारूंचा मुक्त वावर असतो. मात्र तरीही पोलिसांना गस्तीत हे गुन्हेगार सापडत नाहीत हे विशेष. काही दिवसांपूर्वी लुटमारीतूनच आकाशवाणीजवळ खुनाची घटना घडली होती. दरम्यान, काही गुन्हेगार रिक्षाचा वापर करून गुन्हे करतात. तीन दिवसांपूर्वीच शहागंज येथून एका चिमुकलीचे रिक्षातून अपहरण करण्याचा प्रयत्न झाला. यातील आरोपीही अद्याप पोलिसांना सापडलेला नाही.

## उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सकल मातंग समाजाचा मोर्चा

धाराशिव। प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती (एससी) आरक्षणांतर्गत उपवर्गीकरण करण्यास दिलेल्या मान्यतेची राज्यात तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी करीत सकल मातंग समाजाच्या वतीने शुक्रवारी तहसील कार्यालयावर भव्य महामोर्चा काढण्यात आला. यावेळी तहसीलदारांमार्फत राज्य शासनाला निवेदन देण्यात आले.

शहरातील हुतात्मा स्मारक ते तहसील कार्यालया पर्यंत अनुसूचित जाती (एससी) ५९ जाती (अ ब क ड) आरक्षण उपवर्गीकरण समर्थनार्थ काढण्यात आलेल्या मोर्चात आरक्षण उपवर्गीकरण समर्थनार्थ दिलेल्या जोरदार घोषणाबाजीने संपूर्ण परिसर दणाणून सोडला. मोर्चा तहसील कार्यालयावर पोहोचताच त्याचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सभेत रूपांतर झाले. यावेळी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, माजी आमदार सुधाकर भालेराव, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, आझाद क्रांती सेना अध्यक्ष राजेश घोडे, लक्ष्मण क्षीरसागर, अ‍ॅड. सुखदेव होळीकर, नागीण कांबळे, शिवाजी गायकवाड, दिलीप गायकवाड, संजय सरवदे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयामुळे अनुसूचित जातींतील सर्वाधिक मागास व वंचित घटकांना आरक्षणाचा न्याय्य लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून सामाजिक समतेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात अपेक्षित केलेल्या सामाजिक न्याय आणि समतेच्या तत्त्वांची प्रभावी अंमलबजावणी उपवर्गीकरणामुळे होणार असल्याचे नमूद करून आरक्षण प्रवर्गातील सर्व जातींचा समान विकास झालेला नाही, उपवर्गीकरणामुळे मागास घटकांना शासकीय सेवा व शिक्षणामध्ये योग्य प्रतिनिधित्व मिळेल. महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची राज्यात तातडीने अंमलबजावणीची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मोर्चात विजय तोडकर, तुळशीराम देडे, मारुती गायकवाड, सर्जेराव बनसोडे, छाया नायकवडी, अजय सरवदे, सीताराम कांबळे, अ‍ॅड भागवत सगर, मनोज कांबळे आदींसह संविधानप्रेमी नागरिक, युवक-युवती, महिला व सकल मातंग समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चा दरम्यान पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांनी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा बंदोबस्त ठेवला होता.

## जिल्हा परिषदेतील फर्निचर खरेदी संशयाच्या भोवऱ्यात

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जिल्हा परिषदेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि तीन सभापतींच्या दालनांसाठी फर्निचरची खरेदी कोणतीही ई-निविदा न काढता अथवा कोटेशन न मागवता करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रक्रियेत प्रशासनाकडून शासकीय नियमांचे पालन झाले नसून, प्रकरण उघडकीस आल्यानंतर आता सारवासारव सुरू असल्याची माहिती विश्वासनिय सूत्रांनी दिली आहे.

सुरुवातीला अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतींसाठी लागणारे टेबल-खुर्चा व अन्य साहित्य एकत्रित निविदेतून खरेदी करण्याची तयारी होती. मात्र प्रकार उघड झाल्याचे लक्षात येताच आता प्रत्येक विभागाकडून स्वतंत्र निविदा दाखविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्याशी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही. याबाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी सांगितले की, अध्यक्ष व सभापतींच्या दालनांच्या दुरुस्तीसाठी ४० लाख रुपयांची निविदा काढण्यात आली होती.

## तीन हॉटेलचे परवाने रद्द, लाखोंचे खाद्यतेल जप्त

नांदेड । प्रतिनिधी

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर सुरू असलेल्या विशेष तपासणी मोहिमेंतर्गत नांदेड शहर व जिल्ह्यात हॉटेल, उपहारगृहे आणि अन्न आस्थापनांवर एफडीएने धडक कारवाई सत्र सुरू केले आहे. अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन आणि गंभीर त्रुटी आढळल्याने जिल्ह्यातील तीन प्रमुख आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले असून लाखो रुपयांचा खाद्यतेल व ताडीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील देगलूर नाका येथील हॉटेल सवेरा आणि हॉटेल कविता या दोन्ही ठिकाणी तपासणीदरम्यान गंभीर अनियमितता व त्रुटी निष्पन्न झाल्याने त्यांचे अन्न परवाने पुढील आदेशापर्यंत तातडीने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच नवा मोंढा परिसरातील ताडी दुकान क्र. १२ कडे खरेदी बिल अथवा वाहतूक परवाना (ट्रान्सपोर्ट पास) नसल्याने तेथील १५८ लिटर ताडीचा साठा (किंमत ७,११०) जप्त करून जागीच नष्ट करण्यात आला व या दुकानाचेही लायसन्स निलंबित करण्यात आले. या मोहिमेदरम्यान एमआयडीसी व औद्योगिक क्षेत्रातील आस्थापनांवरही छापे मारण्यात आले. यात नियमबाह्य साठा आढळल्याने हजारो लिटर रिफाइंड सोयाबीन तेल जप्त करण्यात आले:श्री स्वामी समर्थ ऑईल ट्रेडिंग (एमआयडीसी, नांदेड): ३,१४८ लिटर (५,१९,४२०), ज्ञानाई स्पाईसेस (कृष्णूर एमआयडीसी, नायगाव): १,०६१ लिटर (३,५३,८००), श्रीनिवास ऑईल अँड फूड्स (हदगाव): १,३६३ लिटर (२,४५,३४०), आयुष ओमकार इंडस्ट्रीज (एमआयडीसी, नांदेड): १,०७८ किलोग्रॅम (१,८६,४९४). ही कारवाई सहआयुक्त (छत्रपती संभाजीनगर) श्रीकांत करकाळे यांच्या निर्देशानुसार सहाय्यक आयुक्त सु. दा. जिंतुरकर, रा. मा. भरकड यांच्यासह अन्न सुरक्षा अधिकारी सं. वि. कनकावाड, वि. स. लोंढे, अ. मा. तम्मडवार, अ. न. गिरी, शि. व. श्रीरामे आणि अ. के. दुधाटे यांच्या पथकाने केली. ''जिल्ह्यातील सर्व हॉटेल व्यावसायिक, उपहारगृहे आणि अन्न सेवा देणाऱ्या आस्थापनांनी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ च्या नियमांचे काटेकोर पालन करावे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील,'' असा थेट इशारा एफडीए प्रशासनाने दिला आहे.

## पाथर्डी तालुक्यात अवैध धंद्यांची गंगा कोणाच्या आशीर्वादाने वाहत आहे?

पाथर्डी प्रतिनिधी

संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलिसांचा धाक पाहायला मिळत असताना एकट्या पाथर्डी तालुक्यात मात्र गुटखा मटका जुगार आणि विषारी माव्याचे साम्राज्य कोणाच्या आशीर्वादाने मोकाट सुरू आहे ? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत यापूर्वी पाथर्डी शहरातील परिस्थितीवर प्रकाश टाकूनही निर्लज्ज प्रशासनाने डोळ्यांवर झापडे ओढून घेतल्याचे स्पष्ट झाले आहे आता ही समस्या केवळ शहरापुरती मर्यादित राहिलेली नसून संपूर्ण पाथर्डी तालुकाच काळ्या धंद्यांचा हॉटस्पॉट बनला आहे लहान मुला-मुलींचे भविष्य टांगणीवर लागलेले असताना स्थानिक पोलीस आणि अन्न व औषध प्रशासन हप्तेबाजीत मग्न असल्याचा थेट नागरिकांमधून आरोप केला जात आहे अहिल्यानगर लॉक मग पाथर्डीतच सूट का आहे जिल्ह्यात इतर ठिकाणी अवैध धंद्यांवर धाडी पडून खाकीचा धाक निर्माण झाला आहे मात्र पाथर्डी तालुक्याच्या सीमेत घुसताच हा कायदा आणि सुव्यवस्था नेमकी कुठे गहाण पडतो असा सवाल निर्माण झाला आहे शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात सुळसुळाट: शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील शाळांच्या ५०० मीटर परिसरात उघडपणे गुटखा मावा आणि जुगाराचे अड्डे चालवले जात आहेत कोवळ्या पिढीचा बळी: शाळा सुटल्यावर किंवा भरताना कोवळी मुले-मुली या व्यसनाच्या आणि असामाजिक तत्त्वांच्या तावडीत सापडत आहेत हप्तेबाजीचा खेळ स्थानिक पोलिसांच्या डोळ्यांसमोर हे सर्व घडत असूनही कारवाईचे केवळ कागदी घोडे नाचवले जात आहेत यामुळे स्थानिक पोलिसांची मूकसंमती आहे का असा संशय बळावला आहे स्थानिक यंत्रणेवरचा नागरिकांचा आणि पालकांचा विश्वास आता पूर्णपणे उडाला आहे त्यामुळे या प्रकरणात आता जिल्हास्तरावरूनच थेट सर्जिकल स्ट्राइक होण्याची गरज आहे

जिल्हभरात धडक कारवाया करणाऱ्या स्थानिक गुन्हे शाखेला () पाथर्डी तालुक्यातील हे उघड अवैध धंदे का दिसत नाहीत? स्थानिक गुन्हे शाखेने तातडीने विशेष पथके तयार करून पाथर्डी तालुका पिंजून काढावा आणि या टोळ्यांचा पर्दाफाश करावा अशी मागणी जोर धरत आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी या गंभीर प्रकाराची थेट दखल घेऊन पाथर्डी तालुक्यातील या काळ्या धंद्यांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करावी अन्यथा तालुक्यातील हजारो संतप्त पालक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत.

पाथर्डीतील शैक्षणिक वातावरण आणि तरुण पिढी विषारी व्यसनांपासून वाचवण्यासाठी आता अन्न व औषध प्रशासन आणि पोलीस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कागदी आव्हानांच्या पलीकडे जाऊन कायमस्वरूपी कारवाई करण्याची वेळ आली आहे पाथर्डीतील धंदेबाजांचे खास मलिदा' देणारे आका कोण आहेत याचा बुरखा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि स्थानिक गुन्हे शाखा कधी टरकावणार ? याकडे संपूर्ण पाथर्डीकरांचे लक्ष लागले आहे

## जाहीरनामा

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय**
**(दड विभाग) ता.आष्टी.जि. बीड**
Email id-tahsildarashtr@gmail.com
**क्र२०२६/दंड विभाग/जन्म-मृत्यू/कावी**
**दूरध्वनी क्र. (०२४४१) २८२५४२**
**दि. २३/७/२०२६**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे बीडसांगवी ता. आष्टी. जि.बीड यांना जाहीर केले जाते कि अर्जदार, नामे, गणगे महादेव भिमराव क्र. अर्जदार नामे, गणगे जनाबाई भिमराव गणगे बीडसांगवी ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे जन्म/मृत्यू दि. १.०/१० २०२४ रोजी मोजे. बीडसांगवी ता. आष्टी जि. बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यूत्वी कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

- करीता सदरहू अर्जदाराचे यांची आई यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समनविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकृती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सुंदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जम्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. २३/७/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरून**
**स्वाक्षरीत /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार आष्टी**



















दैनिक
# राज्य लोकतंत्र
रविवार दि.२६ जुलै २०२६











